महाराष्ट्र शासन

# शासकीस वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

ई-मेल- deangmc2@gmail.com

जा.क्र.महाविद्यालय/खरेदी विभाग/ 12593 /२०२३ दि. 10/7 /२०२३

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर या संस्थेतील बेसिक बि.एस्सी. नर्सिंग विद्यार्थ्यांना अनुभवाकरीता प्रादेशिक मनोरुग्णालय, छिंदवाडा रोड, नागपूर येथे जाणे व येण्याकरीता ५५ सिटर वाहन (१ बस) किंवा ३० सिटर वाहन (२ बस) भाडे तत्वावर मिळणेबाबत.**

**(प्रति दिवस १२ तास अंदाजे व २० ते २५ कि.मी. पर्यतचा प्रवास जाणे-येणे.)**

## जाहिर दरपत्रक सुचना

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर या संस्थेतील बेसिक बि.एस्सी. नर्सिंग विद्यार्थ्यांना अनुभवाकरीता प्रादेशिक मनोरुग्णालय, छिंदवाडा रोड, नागपूर येथे जाणे व येण्याकरीता ५५ किंवा ३० सिटर वाहन (बस) भाडे तत्वावर (प्रति दिवस १२ तास अंदाजे व २० ते २५ कि.मी.पर्यतचा प्रवास जाणे-येणे) करण्यासाठी इच्छुक पुरवठादाराकडुन ई-दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

मोहोरबंद ई-दरपत्रके सादर करण्याची अंतिम तारीख १४ /०७/२०२३ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत असुन दरपत्रक अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांचे नावे सादर करावयाचे आहे. दरपत्रकाच्या लिफाप्यावर **“५० किंवा ३० सिटर वाहन (बस) भाडे तत्वावर दरपत्रक”** असे स्पष्ट नमुद करण्यात यावे. तसेच दर हे पुरवठादाराने त्यांचे लेटर हेडवर खालील नमुन्यात त्या क्रमाने देण्यात यावा. तसेच दरपत्रकासोबत पुरवठादाराचे आवश्यक कागदपत्राची यादी खालील प्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे ती साक्षांकित करुन सादर करणे आवश्यक राहील.

सर्व दर हे एक नगाकरीता सर्व कर समाविष्ठ करुन नमुद करावे. अपुर्ण माहितीसह प्राप्त होणारी दरपत्रके नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता तसेच तांत्रिक समिती यांच्याकडे राखुन ठेवलेला आहे. तसेच मागविण्यात येणाऱ्या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता तसेच तांत्रिक समिती यांच्याकडे राखुन ठेवलेला आहे. तसेच न्युनतम दरनिश्चिती व वस्तु/विषय उत्तम प्रतीची असल्याबाबत शंकेचे निराकरण झाल्यावर त्यानंतर खरेदी आदेश निर्गमित करण्यात येईल. आदेश प्राप्त होताच त्याबाबतची वेळापत्रकानूसार अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

### अटी व शर्ती :-

१) **५० किंवा ३० सिटर वाहन भाडे तत्वावर दरपत्रक** कार्यालयामार्फत खरेदीच्या वस्तु/विषय खरेदी करण्यासाठी एक लिफाफे निविदा पध्दत अवलंबली आहे. जसे :-

अ) किमतीचा लिफाफा व इतर आवश्यक कागदपत्रे.

**२) एका मोठया लिफाफयामध्ये मोहारबंद करुन त्या लिफाप्यावर साहित्याचे नाव स्पष्ट नमुद करण्यात यावे. (उदा. ५० आणि ३० सिटर वाहन (बस) भाडे तत्वावर चे दरपत्रक)**

Scanned with CamScanner

३) लिफाफा मध्ये खालील बाबी द्याव्यात.

अ) साहित्याचे दर.

ब) लिफाफा मध्ये पुरवठादाराने खालील दस्तऐवज क्रमाने लावावी.

१. दुकान नोंदणी प्रमाणपत्र.*

२. भागीदारी (असल्यास) भागीदारी प्रमाणपत्र*

३. अधिकृत विक्रेता प्रमाणपत्र*

४. पॅन कार्ड

५. हेवी (ट्रान्सपोर्ट) ड्राईव्हिंग लायसन*

६. इन्शुरन्स*

७. दिलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्यास तसे लेखी प्रतिपादन लेटरहेडवर नमुद करुन स्वाक्षरी करावी.

८. खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर व खरेदी विभागातील कर्मचारी यांच्याशी कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबतचे लेखी प्रतिपादन लेटरहेडवर नमुद करुन स्वाक्षरी करावी. (नमुना सोबत जोडला आहे.)

(उपरोक्त आवश्यक दस्तऐवज चा समावेश नसल्यास सदर दरपत्रक बाद करण्याचा संपुर्ण अधिकार महाविद्यालय खरेदी समितीकडे राखुन ठेवलेला आहे.)

४) लिफाफा मध्ये दिलेले विनिर्दीष्टे (Specification) चा तक्ता तयार करुन सदर विनिर्दीष्टे(Specification) मान्य असेल तर त्या समोर होय/नाही असे नमुद करावे.

सदर वस्तु/विषय/**५० किंवा ३० सिटर वाहन (बस) भाडे तत्वावर दरपत्रक** उत्तम प्रतीची/दर्जा/आपल्या वाहनाबाबतचा अनुभव असणे अपेक्षित आहे. त्याकरिता नमुद विनिर्दीष्टे (Specification) प्रमाणे वस्तु/विषय चा दर्जा जोपासण्याकरिता तांत्रिक समितीला आवश्यक वाटल्यास सदर वस्तु/विषय चा नमुना मागविण्याचा अधिकार राहिल व त्याची पुर्तता करण्याची जबावदारी आपली राहील त्याकरिता कोणत्याही प्रकारचा आगाऊ खर्च या संस्थेमार्फत अदा केला जाणार नाही. आवश्यकता भासल्यास नमुना/पुरवठा केलेल्या वस्तु चा विनिर्दीष्टे (Specification) ची तपासणी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय/**मोटार वाहन विभाग (आर.टी.ओ.),नागपूर** यांचेकडून करुन घेण्यात येईल आणि त्यासाठीचा होणारा खर्च हा संबंधित पुरवठादाराला अदा करावा लागेल.

| अ.क्र. | विवरण | प्रवासाचा कालावधी व अंतर | दर प्रतिदिवस (सर्व करासह) |
|---|---|---|---|
| १ | ५० सिटर वाहन (बस) | (प्रति दिवस अंदाजे १२ तास व २० ते २५ कि.मी. पर्यंतचा प्रवास जाणे-येणे) | |
| २ | ३० सिटर वाहन (बस) | (प्रति दिवस अंदाजे १२ तास व २० ते २५ कि.मी. पर्यंतचा प्रवास जाणे-येणे) | |

(डॉ.राज गजभिये)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपूर

Scanned with CamScanner